MHBI100023002022

## नियमीत दिवाणी दावा क्रमांक ५२७/२०२२ मधील
## निशाणी क्र. ५ खालील आदेश

[०१] प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ३९ नियम १ व २ अन्वये दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो प्रतिवादीने वादग्रस्त मिळकत कोणासही कोणत्याही मार्गाने हस्तांतरीत करु नये, असा तुर्तातुर्त मनाई हुकुम प्रतिवादीच्या विरुध्द व वादीच्या हक्कात पारीत करण्याच्या मागणीकरीता सादर केलेला आहे.

[०२] वादींचे पुढे असे कथन आहे की, वादी व प्रतिवादी हे हिंदू एकत्र कुंटूंबाचे सदस्य असून त्यांच्यात आजपोवेतो मिळकतीच्या वाटण्या झालेल्या नाहीत. वादीने वाटपाकरीता प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे.

[०३] वादग्रस्त मिळकतीचे वर्णन :

मौजे एकुरका, ता. केज जि. बीड येथील जमीन जिचे वर्णन खालीलप्रमाणे

| स. नं. / गट नं. | एकुण क्षेत्र हे. आर. | आकार रू.पै. | पोटखराब हे. आर. | पैकी वादग्रस्त हे. आर. पो.ख.सह |
|---|---|---|---|---|
| ९१/१ | ०४.७७ | ०८.६७ | ००.०२ | ०१.२५+००.०१ पो.ख. |
| १००/१२ | ००.९२ | ०१.७६ | ००.०० | ००.३१ |
| १००/७ | ००.२७ | ००.५१ | ००.०० | ००.१८ |
| १४८/२ | ००.९८ | ०३.८४ | ००.०० | ००.२१.६७ |
| ३८/१ | ००.४९ | ०१.०९ | ००.०० | ००.०१ |

(सदर मिळकतींना यापुढे सोईकरिता 'वादग्रस्त मिळकती' म्हणून संबोधण्यात येईल).

[०४] वादींचे पुढे असे म्हणणे आहे की, वादी क्र.१ व २ हे प्रतिवादी क्र.१ व २ यांचे नातु आहेत व प्रतिवादी क्र.३ चे मुले आहेत. वादी क्र. १ व २ यांची प्रतिवादी क्र.४ चुलत बहिण आहे व प्रतिवादी क्र.५ ही चुलती आहे. तसेच, प्रतिवादी क्र.६ ही आत्या

आहे. वादी क्र.३ ही प्रतिवादी क्र.१ व २ यांची सुन असुन प्रतिवादी क्र.३ ची पत्नी आहे. तसेच, प्रतिवादी क्र.४ ची चुलती असुन प्रतिवादी क्र.५ ची जाऊ आहे. प्रतिवादी क्र.६ ही वादी क्र.३ ची जाऊ आहे. वादग्रस्त मिळकत हि वादी व प्रतिवादी यांची एकत्र कुटुंबाची वडीलोपार्जित सामाईक मिळकत असून त्यांचामध्ये अद्याप वाटण्या झालेल्या नाहीत. त्यामुळे प्रस्तुत वादग्रस्त मिळकतीत वादींचा अविभाज्य हिस्सा आहे. तसेच, वादग्रस्त मिळकती हया हिंदु एकत्र कुटुंबाच्या मिळकती असुन प्रतिवादी क्र.३ च्या नावावरील मिळकती हया हिंदु एकत्र कुटुंबात खरेदी घेतलेल्या मिळकती आहेत व उर्वरीत हया वडिलोपार्जित मोरवशी जमीनी आहेत.

[०५] वादींचे पुढे असे कथन आहे की, वादी क्र.१ व २ यांचा चुलता नटराज रामहारी धस हा ऑगस्ट २०२२ मध्ये मयत झालेला असल्यामुळे त्याची पत्नी व मुलगी प्रतिवादी क्र.४ व ५ हया पार्टी केलेल्या आहेत. तसेच, वादग्रस्त मिळकत ही प्रतिवादी क्र.४ च्या नावे असल्यामुळे ती दाव्यात आवश्यक पार्टी केलेली आहे. तसेच प्रतिवादी क्र.५ चा मुलगा नामे रोहण नटराज धस हा ऑगस्ट २०२२ रोजी मयत झालेला आहे.

[०६] वादींचे पुढे असे कथन की, दाव्यातील सर्वे क्र.३८/१ मध्ये वादी क्र.१ व २ यांचे वडील व वादी क्र.३ चे पती, सासरे व दीर यांनी शेतामध्ये एकत्र कुटुंबात पक्के विट बांधकाम केलेले आहे. व सदरचे घर हे स्लॅपच्या दोन रूम व काही पत्र्याच्या खोल्या असुन त्यामध्ये वादी क्र.१ ते ३ यांचा अविभाज्य हिस्सा आहे व सदरचे घर शेतामध्ये बांधलेले आहे.

[०७] वादींचे पुढे असे कथन की, दाव्यातील प्रतिवादींनी दि. २०.११.२०२२ रोजी वादग्रस्त मिळकतीत वादींचा कायदेशीर हक्क नाकारून त्यांना शेतातुन अपमानित करून हाकलुन दिले. प्रतिवादीने त्यास नकार दिल्यामुळे सदर दाव्यास कारण घडले. तसेच, प्रतिवादी हे वादग्रस्त जमीनी गावातील इतर लोकांना विक्री करण्याच्या प्रयत्नात असल्यामुळे वादींनी प्रस्तुतचा मनाई हुकूमाचा अर्ज दाखल केला आहे.

[०८] प्रतिवादी क्र. १, २, ३ व ६ यांना निशाणी क्र. २० नुसार दाव्याचे व प्रस्तुत अर्जाचे समन्स व नोटिसची बजावणी होवूनही ते दाव्यात हजर न राहिल्याने दिनांक ०६.०१.२०२३ रोजी निशाणी क्र. १ वर सदर दावा व अर्ज त्यांचेविरुध्द एकतर्फा चालविण्याचा आदेश पारीत केला आहे.

[०९] प्रतिवादी क्र.४ व ५ तर्फे निशाणी क्र.३२ वर लेखी जवाबदावा दाखल केला. सदर प्रतिवादींनी वादी व सदर प्रतिवादींचे नाते, वादग्रस्त जमीनीचे वर्णन मान्य केलेले आहे. सर्वे नं. ९९/१ मधील ४० आर जमीन ही वडिलोपार्जित असल्याचे नाकारले आहे. तसेच, दाव्यास आवश्यक मिळकतींची व पक्षकारांची बाधा असल्याचे कथन केले आहे.

[१०] प्रतिवादींचे कथन की, वादग्रस्त मिळकतीपैकी सर्वे नं. ९९/१ मधील ४० आर जमीन ही वडिलोपार्जित नसुन प्रतिवादी क्र. ५ हीने स्वत:चे स्त्रीधन खर्च करून श्रीकिसन रावसाहेब धस यांच्याकडुन नोंदणीकृत खरेदीखत क्र. ९७८/२२ आधारे तिचा मुलगा रोहनच्या नावावर खरेदी केलेली आहे. सदर मिळकतीवर वादी व इतर प्रतिवादींचा काहिही हक्क नाही. अशा प्रकारे, सदर मिळकतीच्या हद्दीपर्यंत दावा खारीज करण्याची विनंती केली.

[११] प्रस्तुतच्या अर्जानुषंगे खालील मुद्दे उपस्थित होवून त्यांचे निष्कर्ष खाली नमुद करण्यात आलेल्या कारणानुषंगे त्यापुढे नमुद करण्यात येत आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दावा वादींच्या बाजूने असल्याचे वादींनी प्रथमदर्शनी सिध्द केले आहे काय ? | नकारार्थी. |
| २. | अनुकूलतेचा समतोल वादीच्यां बाजुने आहे काय ? | नकारार्थी. |
| ३. | जर तात्पुरता मनाई हुकूम दिला गेला नाही तर वादींचे अपरिमीत असे नुकसान होणार आहे काय ? | नकारार्थी. |
| ४. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

[१२] प्रस्तुतच्या अर्जाच्या समर्थनार्थ वादी क्र. ३ मनिषा विठ्ठल धस यांनी स्वतःचे शपथपत्र, दावा मिळकतीचे ८अ चे उतारे, दावा मिळकतीचे सात बारा उतारे इत्यादी दस्तऐवज सादर केलेले आहेत.

[१३] प्रतिवादी १, २, ३ व ६ विरुध्द दावा एकतर्फा असल्यामुळे त्यांच्या वतीने कोणतेही लेखी म्हणणे, दस्तऐवज व युक्तीवाद नाही.

**मुद्दा क्रमांक १ ते ४ साठी :-**

[१४] वादी व प्रतिवादी क्र.४ व ५ यांचा युक्तीवाद ऐकला. सर्व मुद्दे हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे विश्लेषणाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीतरित्या विचारात घेण्यात आले.

[१५] प्रतिवादी क्र.१ व २ हे पती पत्नी असुन प्रतिवादी क्र.३ त्यांचा मुलगा, ६ त्यांची मुलगी आणि मयत नटराज रामहारी धस त्यांचा मयत मुलगा आहे. वादी क्र. १ व २ हे प्रतिवादी क्र.३ चे अपत्य असुन वादी क्र.३ पत्नी आहे. प्रतिवादी क्र.४ व ५ हे मयत नटराज चे मुलगी व पत्नी आहेत. या नात्याने प्रतिवादी क्र.१ हा वादी व प्रतिवादींच्या कुटूंबाचा कुंटूबकर्ता आहे.

[१६] वादग्रस्त मिळकतीचे ७/१२ व ८ अ उतारे (निशाणी क्र. ६ ते १४) चे अवलोकन करण्यात आले. वादग्रस्त मिळकत सर्वे नं. ९९/1 मधील ८५ आर पो.ख १ आर, सर्वे नं. १४८/२, ३८/१, १४८/२ या मिळकती प्रतिवादी क्र.१ च्या नावावर दिसुन येतात. सर्वे नं. ९९/1 मधील ४० आर मिळकत मयत नटराजचा मुलगा रोहनच्या नावावर दिसुन येतात. सर्वे नं.१००/१२ व १००/७ मधील मिळकत प्रतिवादी क्र.३ च्या नावावर दिसुन येते.

[१७] वादीच्या कथनाप्रमाणे सदर मिळकत हिंदु एकत्र कुंटूबाच्या व वडीलोपार्जित मिळकती आहेत. प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी त्यांच्या लेखी जबाबात

प्रतिवादी क्र.१ रामहारी बप्पाजी धस हे कुटुंबकर्ता असल्याचे कथन केलेले आहे. अशा परिस्थीतीत वादी क्र.१ व २ चे आजोबा व वादी क्र.३ चे सासरे व प्रतिवादी क्र. ३ चे वडील यांचे प्रतिवादी क्र.१ रामहारी बप्पाजी धस हे कुटुंबकर्ता असल्याचे बाब वादातीत नाही. कुंटूबकर्त्याला वादग्रस्त मिळकतीची देखभाल, व्यवस्था व विल्हेवाट लावण्याकरीता कायदेशीर, विनाआव्हानित हक्क व अधिकार असतात. या कायदेशीर प्रमाणीत तत्वा अन्वये वादीला सदर अर्जाद्वारे कुटूंबकर्ताच्या कायदेशीर अधिकारांवर गदा आणता येणार नाही. या कारणाकरिता वादीला त्यांच्या लाभात प्रथमदर्शनी दावा नाही.

[१८] प्रतिवादी क्र.४ व ५ यांच्या कथनाप्रमाणे वादग्रस्त मिळकतीपैकी सर्वे नं. ९९/१ मधील ४० आर जमीन ही वडिलोपार्जित नसुन प्रतिवादी क्र. ५ हीने नोंदणीकृत खरेदीखत क्र. ९७८/२२ आधारे खरेदी केलेली आहे. त्यामुळे सदर वादग्रस्त मिळकतीची कायदेशीर स्थिती पुराव्यानिशी सिध्द होणे गरजेचे आहे. या कारणाकरिता देखील वादीला त्यांच्या लाभात प्रथमदर्शनी दावा नाही.

[१९] वादीचे कथन की प्रतिवादींनी वादींचा हक्क नाकारून वादग्रस्त मिळकत विक्री करण्याच्या प्रयत्नात आहे. परंतू त्याअनुषंगाने प्रतिवादींनी काय हालचाल केली आहे, कोणासोबत व्यवहार करणार आहे, किंवा त्याबाबत जाहीर नोटिस इत्यादी कृतीवजा प्रयत्न केल्याबाबत वादीनी अभिलेखावर काहीही दाखल केलेले नाही. तसे कथनही मांडलेले नाही. वादीचे हे कथन प्रतिवादीने नाकारलेले असुन प्रतिवादीच्या कायदेशीर हक्काचा विचार करता, वादीने त्याची दाव्यातील कथने सिध्द करण्याची जबाबदारी वादीवरच आहे. या कारणाकरिता वादीला त्यांच्या लाभात प्रथमदर्शनी दावा नाही.

[२०] वरील परिच्छेदात विस्तृतपणे कारण व विश्लेषण केल्याप्रमाणे वादीच्या लाभात प्रथमदर्शनी मुद्दा नसला तरी वादीला कोणतीही तोषीस अथवा नुकसान होत नाही. कारण सदर दाव्याच्या अंतिम निकालावेळी वादी असे प्रथमदर्शनी सिध्द करु शकले की वादग्रस्त मिळकतीत त्यांना हिस्सा मिळण्यास ते पात्र आहेत, तर त्यांचे

हिस्याचे संरक्षण मालमता हस्तांतरण अधिनियमाचे कलम-५२ अन्वये त्यांच्या लाभात असणार आहे. म्हणून माझे प्रमाणिक मत आहे की, प्रस्तुतचा दावा प्रथमदर्शनी वादीच्या लाभात नाही. सबब मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

[२१] एकुणच उपरोक्त कारणांचा व विश्लेषणाचा विचार करता, वादी त्यांचा दावा प्रथमदर्शनी सिध्द करण्यात अपयशी ठरल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे अनुकुलतेचा समतोल देखील त्यांच्या बाजूने असण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. अशा परिस्थितीत जर वादीनीं मागितल्या प्रमाणे तात्पुरत्या मनाई हुकूमाचा आदेश नाकारण्यात आल्यास, त्यांचे काहीएक नुकसान होईल असे अभिलेखावरुन दिसुन येत नाही. त्यामुळे एकुणच वरनमुद विश्लेषणाचा विचार करता, विचारार्थ असलेल्या मुद्दा क्र.२ व ३ चा निष्कर्ष नकारार्थी स्वरुपात नोंदविण्यात येत असून मुद्दा क्र.४ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

**(१)** अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

**(२)** प्रस्तुत अर्जाच्या खर्चाची रक्कम मुळ दाव्यात ठरविली जाईल.

सही/-
(ए.टी. जगताप)
३रे सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
केज

दिनांकः- २०.०३.२०२५.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file are same word to word, as per the original Order / Judgment.

Dictated on : 20.03.2025

Transcribed on : 20.03.2025

Checked & signed on : 20.03.2025

Sd/-
(P. P. Raut)
Stenographer Grade-3,
Ct. of 2nd Jt. CJJD and JMFC, Kaij.